**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.२, उरण.**

**एस.सी.सी. क्र. ७७५/२०२५** **निशाणी क्र. ८**

**सरकार – वि – फरहान**

**गुन्हयाचा तपशिल**

१. अपराध घडल्याचा दिनांक : १६.०१२.२०२४

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक : २५.०४.२०२५

३. फिर्यादरादाराचे संपुर्ण नाव व पत्ता : **महाराष्ट सरकार** मार्फत
लेबर एन्फोर्समेंट ऑफीसर,
मुंबई

४. आरोपीचे संपुर्ण नाव व पत्ता : मे. फयुचर स्टाफींग सोल्युशन्स प्रा. ली. तर्फे **फरहान आझमी**,
संचालक,
मालाड वेस्ट, मुंबई

५. ज्याबदद्ल फिर्याद दिली आणी जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशिल :

दिनांक १६.१२.२०२४ रोजी १.०० वाजताचे सुमारास तुम्ही तुमचे मे. फयुचर स्टाफींग सोल्युशन्स प्रा. ली. या कंपनीत आवश्यक असलेली कागदपत्रे बाळगली नाहीत तसेच रेकॉर्ड ठेवले नाही. त्यामुळे तुम्ही कॉन्ट्रॅक्ट लेबर रेग्युलेशन चे नियम ८२/१,

२५/२, ७५ व ७८/१ चे उल्लंघन करुन कलम २४ अंतर्गत शिक्षापात्र गुन्हा केला असून त्याची मी दखल घेतली आहे.

याव्दारे मी असे निर्देश देतो की, तुमच्या विरूध्द वरील आरोपान्वये खटला चालविण्यात यावा.

दिनांक : १२.०३.२०२६

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २, उरण.

वरील गुन्हयाचा तपशील आरोपीला त्यांच्या भाषेत वाचुन दाखविण्यात आला तसेच समजावून सुध्दा सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल असल्याचे सांगीतले. आरोपीचे म्हणणे/जबाब नोंदविण्यात आले.

दिनांक : १२.०३.२०२६

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २, उरण.

६.	**आरोपीचा जबाब/म्हणणे**

प्रश्न १ : तूम्हाला पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तर : होय

प्रश्न २ : तूम्हाला गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगीतला, तो तुम्हाला समजला काय ?

उत्तर : होय

प्रश्न ३ : तूम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय ?

उत्तर : नाही

प्रश्न ४ : तूम्हाला गून्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे

१. ......................................

आरोपींची सही

दिनांक : १२.०३.२०२६

एस. पी. वानखडे

प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र. २, उरण.

## न्यायनिर्णय

(दिनांक १२.०३.२०२६ रोजी पारीत)

आरोपी हजर. आरोपीला गुन्हयाचा तपशिल त्याचे भाषेत वाचुन व समजावून सांगीतला. त्याने गुन्हा कबुल असल्याचे सांगीतले. त्याने त्याबाबत निशाणी क्र. ७ वर पुरसीस दाखल केली. तो स्वेच्छेने गुन्हा कबुल करतो याची मी खात्री केल्यानंतर मी त्याची कबुली मान्य केली व त्याला दोषी ठरविले.

आरोपीचे शिक्षेबाबत म्हणने ऐकले. त्याने कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. त्यामुळे गुन्हयाचे स्वरूप व सर्व परीस्थीती पाहता मी न्यायाचे दष्टीने पुढील आदेश पारीत आहे.

## आदेश

१. आरोपी **मे. फयुचर स्टाफींग सोल्युशन्स प्रा. ली. तर्फे फरहान आझमी** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम २७५ अन्वये त्याचेवर लावलेले Contract Labour (Regulation and Abotion Act) चे कलम २४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयात दोषी ठरवुन त्याला १०००/- (एक हजार रूपये फक्त) दंडाची शिक्षा ठोठावण्यात येते व ती दंडाची रक्कम न भरल्यास ८ दिवसाची साधी कैद देण्यात येते.

२. आरोपीस न्यायनिर्णयाची प्रत मोफत देण्यात यावी.

SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE
Digitally signed by SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE
Date: 2026.03.16 12:05:06 +0530

दिनांक : १२.०३.२०२६

एस. पी. वानखडे
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. २, उरण.